४) **श्रीमती. सविता शिवणकर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

५) **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्पास समर्थन दर्शविला.<br>• गावांतील युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात यावे जेणेकरून त्यांना इतर रोजगारामध्ये संधी प्राप्त होईल.<br>• पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) उभारावे.<br>• उद्योगाने अद्यावत तंत्रज्ञानावर आधारीत हवा व जल प्रदूषण यंत्रणा उभारावी.<br>• वृक्षारोपन करावे ज्यामध्ये फळझाडे व औषधी झाडे असावीत.<br>• उद्योगामध्ये एकुण गुंतवणुकीच्या मानाने रोजगाराच्या संधी अधिक असल्याने उद्योगाचे स्वागत आहे. | प्रस्तावित प्रकल्पामध्ये सुध्दा परिसरातील पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करण्यात येईल. तसेच औद्योगिक सांडपाण्याचा उद्योगामध्येच पुर्नवापर करण्यात येईल व घरगुती सांडपाण्यासाठी Sewage Treament Plant उभारून त्याचा वापर उद्योगाच्या परिसरात बागबगीच्याकरीता करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरीता अद्यावत यंत्रणा उभारण्यात येईल. |

६) **श्री. चंद्रशेखर, एनजीओ, हैद्राबाद.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | यांनी प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे स्वागत केले. उद्योगाने आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. स्थानिकांना रोजगार दयावा. तसेच गावांच्या विकासाकरीता कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) मार्फत मदत. | याबाबत प्रकल्प धारकाने स्पष्ट केली की, प्रकल्प परिसरात वृक्ष लागवड केली जाईल व स्थानिकांनाच रोजगार प्राधान्य दिल्या जाईल. |

७) **श्री. संजय सत्यकार, सामाजिक कार्यकर्ता.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | • २४००० टन प्रतीवर्ष प्रस्तावित उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची वाहतुक कशी करणार.<br>• परिसरात धूळ उडणार नाही उद्योगाने स्थानिक माहिलांच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी.<br>• पाण्याच्या स्त्रोत व औद्योगिक सांडपाण्याचा निचरा बाबत माहिती देण्यात यावी.<br>• प्रस्तावित प्रकल्पासाठी सद्यस्थितीतील ७ एकर जमीन क्षेत्र पुरेसे आहे किंवा कसे याबाबत खुलासा करावा.<br>• या उद्योगाच्या परिसरात ८ गांवे आहेत. स्थानिकांनाच रोजगार दयावा.<br>• परिसरातील नागरीकांना धुळीचा त्रास होणार नाही याची प्रकल्पधारकाने दक्षता घ्यावी. | कच्च्या मालाची वाहतुक ट्रकद्वारे ताडपत्रीने आच्छादन करून केली जाईल. प्रकल्प परिसरात वृक्ष लागवड केली जाईल व स्थानिकांनाच रोजगार प्राधान्य दिल्या जाईल.<br>प्रस्तावित प्रकल्पासाठी सद्यस्थितीत उपलब्ध असलेली ७ एकर जमीन पुरेशी आहे व यामध्ये मोठ्या प्रमाणात हरितपट्टा विकसीत करण्यात येईल व वृक्षारोपनाकरीता गावकऱ्यांची मदत घेण्यात येईल. |

